Open Access

IJASSH

International Journal of Arts, Social Sciences and Humanities

**(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)**
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://ijassh.aaassher.org/
ISSN (Online): 2584-1130
Volume 1, Issue 2, June 2023; Pages 17 – 20
DOI: 10.5281/zenodo.10223758

**Original Research Article**

# भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या: एक अभ्यास

रावसाहेब पिराजी इंगळे

अर्थशास्त्र विभाग, योगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती, जिल्हा लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* rpingle77@gmail.com

Received: 07 April, 2023 | Accepted: 17 May, 2023 | Published: 19 May, 2023

## सारांश

भारत हा कृषीप्रधान देश आहे पण या देशातील शेतकरी मात्र दु:खी, दारिद्र्य आहे. असेच आपणाला म्हणावे लागेल कारण दु:ख व दारिद्र्याने जीवनात आलेल्या नैराश्यातून आत्महत्या केलेल्या लोकांची आकडेवारी पाहता त्यात सर्वाधिक आत्महत्या शेतक्ऱ्यांनीच केल्या आहेत. भारतातील शेतक्ऱ्यांच्या आत्महत्येचे मुख्य कारण म्हणजे नैसर्गिक संकटामुळे शेती उत्पादनात होणारी घट शेतमालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे व वाढता कर्जाचा डोंगर यामुळे भारतातील शेतक्ऱ्यांच्या आत्महत्या वाढत असल्याचा अहवाल राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण शाखेने व्यक्त केला आहे. अगदी अलीकडील काळात म्हणजे 2020 मध्ये देशात एकूण 5579 शेतक्ऱ्यांनी विविध कारणातून भारतातील शेतक्ऱ्यांनी मृत्यूला कवटाळल्याची माहिती तत्कालीन कृषी मंत्री नरेंद्र तोमर यांनी दिली होती. 2019 ला देशात पाच हजार 957 शेतक्ऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. 2020 मध्ये 2019 च्या तुलनेत शेतक्ऱ्यांच्या आत्महत्या मध्ये किंचित घट झाली असली तरी हा आकडा कमी नाही. कृषी प्रधान अर्थव्यवस्थेत शेतकरी आत्महत्येचे कारणे सांगताना NCRB ने कौटुंबिक समस्या, आजारपण, अमली पदार्थांचा गैरवापर, व्यसन, प्रेमप्रकरणे, विवाहसंबंधीचे मुद्दे, परीक्षेतील अपयश, संपत्ती वाद इत्यादी कारणे दिलेली होती. भारताला स्वातंत्र्य मिळून सात दशक उलटून गेली तरी भारत सरकारला शेतक्ऱ्यांच्या प्रश्नाला न्याय देता आला नाही असेच म्हणावे लागेल. जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी हा आज अन्नसुरक्षा योजनेद्वारे स्वस्त धान्य दुकानाच्या रांगेस उभारून धान्य खरेदी करतो. याचे मुख्य कारण म्हणजे पारंपरिक पद्धतीची शेती ही आहे.

**महत्वाचे शब्द:** शेती, आत्महत्या, कारणे, दारिद्र्य, बेकारी.

**प्रस्तावना**

15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. ब्रिटिश कालीन भारतात ब्रिटिशांनी देशाच्या विकासासाठी ज्या योजना आखल्या. त्या सर्व योजना या विशिष्ट उद्देशाने आखल्या. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने रशियाच्या धर्तीवर नियोजन आयोगाची स्थापना करून देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी जी पहिली पंचवार्षिक योजना आखली त्यात शेती क्षेत्राला प्राथमिकता दिली.

**अभ्यासाचे उद्देश**

१. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे शोधणे.
२. शासकीय धोरणाचा अभ्यास करणे.
३. शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी उपाय सुचविणे.
४. देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे.

**अभ्यासाची गृहितके**

१. शासकीय धोरणे, शेती क्षेत्रातील उदासीनता, बाजार व्यवस्था, शेतीसाठी आवश्यक साधनसामग्रीच्या वाढत्या किमती, शेतकरी आत्महत्येस कारणीभूत आहेत.
२. शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या शेतकरी कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही.
३. शेती व्यवसायासाठी प्रभावी विमा संरक्षण नाही.
४. भारतातील काही प्रमुख राज्यात शेतकरी आत्महत्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**संशोधन पद्धती**

*'भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक अभ्यास'* या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच द्वितीयक साधनसामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**संशोधन विषयाचे स्पष्टीकरण**

शेती क्षेत्रातील उत्पन्नात आज तागायत चार पट वाढ झाली तरी देखील भारतातील शेतकरी खूप मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतो आहे. त्याचे प्रमुख कारण ही वाढलेली लोकसंख्या आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीचे तुकडीकरण होत चालले आहे व त्यातून मिळणारे तुटपुंजे उत्पन्न त्यामुळे शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. त्यात भर पडली ती 1991 च्या नवीन आर्थिक धोरणामुळे शेतीला दिली जाणारी सबसिडी हळूहळू कमी करण्यात आली. तसेच अनेक विदेशी कंपन्या भारतात आल्या व भारतातील शेतकरी व त्याचे प्रश्न दुर्लक्षित राहिले. त्यामुळे भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत गेल्या आहेत. 1996 ते 2005 पर्यंत भारतातील 1 लाख 66 हजार 204 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत तर 2001 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार भारतातील 70 लाख शेतकऱ्यांनी शेती करण्याचे बंद केले आहे तर 2011 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्ये 1534 शेतकऱ्यांनी आत्महत्या

केल्या आहेत. 2008 मध्ये 16,196 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर 2009 मध्ये त्यात 1172 शेतकऱ्यांची भर पडली. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या 1995 ते 2011 मध्ये 7 लाख 50 हजार 860 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. देशातील शेतकरी आत्महत्याची आकडेवारी पाहता दर एक लाख शेतकऱ्यांपैकी दोन शेतकरी आत्महत्या करत असल्याचे चित्र समोर येते. अलीकडील कळाल समोर आलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील शेतकरी सर्वाधिक आत्महत्या करतात. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर कर्नाटक व तिसऱ्या क्रमांकावर आंध्र प्रदेश राज्याचा नंबर लागतो. महाराष्ट्रातील मराठवाडा प्रादेशिक विभागाचा विचार केला तर 2019 मध्ये महाराष्ट्राच्या केवळ मराठवाडा प्रादेशिक विभागात 730 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. 2020 मध्ये 773 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. 2021 मध्ये तब्बल 887 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर 2022 मध्ये 1023 शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. यावरील सर्व आकडेवारीवरून शेतकऱ्यांच्या आत्महत्यात सतत वाढच झाल्याचे चित्र दिसून येते.

**भारतातील शेतकरी आत्महत्येची कारणे**

१. शेतकऱ्यांच्या अनुदानात झालेली घट.

२. वेळेवर विमा भेटत नाही.

३. खते बी-बियाण्यांच्या वाढत्या किमती.

४. मान्सून वर आधारित शेती.

५. शेतमाला मिळणारा बाजारभावास हमी नाही.

६. शेतकऱ्यातील असंघटितपणा.

७. पारंपारिक चालीरीती,

८. व्यवहार ज्ञानाचा अभाव.

९. शिक्षणाची कमतरता.

१०. खोटी प्रतिष्ठा.

११. वाढते मजुरी दर.

१२. कर्जपुरवठ्याची समस्या.

१३. लघुउद्योग व्यवसायाची कमतरता.

१४.खाजगी सावकार, दलाल, अडत्याकडून शोषण.

१५.वीज तुटवडा.

१६. महागाई.

१७.शासनाची उदासीनता.

१८.वाढते कुटुंब.

१९. प्रक्रिया उद्योगांची कमतरता.

२०. साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा.

**शिफारशी**

१. शेतकरी आत्महत्या राष्ट्रीय आपत्ती घोषित करावी.

२. शेतकऱ्यांना पीक विमा संरक्षण सदृढ करावे.

३. कृषी क्षेत्रातील सबसिडी पुरवावी.

४. अधिक कृषी क्षेत्र सिंचनाखाली आणावे.

५. जलयुक्त शिवार योजनेची व्याप्ती वाढवावी.

६. शासनाने शेतकऱ्यांना पूरक उद्योग उभारण्यास अर्थसहाय्य करावे.

७. शेतकऱ्यांना शेतीविषयक सल्ला देणारे सल्लागार नेमावेत.

८. हम दो हमारा एक नारा अंगीकारावा.

९. शेतकऱ्यांनी आपल्या गरजा नियंत्रित कराव्यात.

१०. कृषी विकास कर सुरू करावा.

११. शेतकऱ्यांच्या मुलाला मोफत शिक्षण द्यावे.

वरील वेगवेगळे प्रयोग करून शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करावा व शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून प्रवृत्त करावे.

**संदर्भ सूची**


१. Agrawal A. N., *Indian Agriculture,* Vani Edu. Book 1986.

२. Black J. D., *Introduction to Economics for Agriculture,* Macmillan 1953.

३. Periodicals: शेतकरी, बळीराजा योजना, इकॉनॉमिक्स, मास्को न्यूज, अर्थसंवाद.

४. Chauhan D. S., Agriculture Economics, Laxmi Narayan Agrawal 1953.

५. डॉ. विजय कवीमंडन, *कृषी अर्थशास्त्र*, 2006.

६. दै. लोकसत्ता.

७. दै. लोकमत.

८. दै. महाराष्ट्र टाईम्स.

९. दै. सकाळ.

१०. दै. सामना.

११. लोकराज्य.

१२. ढोबळे विष्णू, *शेतकऱ्यांच्या आत्महत्या : जागतिकीकरणातील शोकांतिका*, सुगावा प्रकाशन, पुणे.

१३. डॉ. संभाजी काळे, *शेतकऱ्यांच्या आत्महत्या वास्तव आणि उपाय,* अथर्व प्रकाशन, जळगाव. जानेवारी - 2000.